# Letters issued by state government or central government indicating the reserved category

**S.N.D.T. Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone + 91 22 2203 1879
Fax + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरीन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Telegram UNIWOMEN
Website sndt.ac.in

जावक क्र. विशेष कक्ष/अ-०४/२०२३-२४/ ३२

दि. १६/०४/२०२३

## परिपत्रक :

**विषय :** विद्यापीठातील पदव्युत्तर विभाग, संचलित व संलग्न महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रवेशासंबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती ...

**संदर्भ :** १) विद्यापीठ अनुदान आयोगाची पत्रं क्रमांक :
- D.O.No.F.1-6/89(SCT), दि. 30.07.1989,
- D.O.No.F.1-4/97(SCT), दि. 18.06.1997,
- F.1-5/2006(SCT), दि. 25.08.2006

२) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय यांचे
- शा. नि. क्र. युएसजी-१४९३/(२४२८)/विशि-४, दि. २३.०६.१९९४
- शा. नि. क्र. युएसजी-१४९४/१६११४/(२९०३)/ विशि-४, दि. ११.०१.१९९५
- शा. नि. क्र. टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)तांशि-१, दि. ११.०७.१९९७
- पत्र क्र. बीयुसी-२००९/(२३/९)मशि-५, दि. २३.०१.२००९
- शा. परि. क्र. संकीर्ण-२०११/प्र.क्र.२२/विशि-३, दि. ०८.०३.२०११

३) महाराष्ट्र अॅक्ट नं. XXX ऑफ २००६, दि. ०१.०८.२००६

४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचा,
- शा. नि. क्र. बीसीसी-१०९४/सीआर-५७/९४/१६-ब, दि. ०५.१२.१९९४

महोदया / महोदय,

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, विद्यापीठातील विविध पदव्युत्तर विभाग, संचलित व संलग्न महाविद्यालयांतील सर्व अनुदानित व विना-अनुदानित (पदवी, पदव्युत्तर, एम.फील., पी.एच.डी. वगैर... सर्व) अभ्यासक्रमांतील प्रवेशामध्ये आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करणेचे निर्देश आहेत. त्यानुसार अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रवेशासंबंधात अनुसरावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे ;

**(१) अभ्यासक्रमाची जाहिरात / प्रसिध्दी करणे :**

महाविद्यालय/विभागामध्ये शिकविल्या जाणा-या सर्व अभ्यासक्रमांची आरक्षण संदर्भासह, प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे योग्य जाहिरात प्रसिध्द करावी.

**(२) प्रवेश समिती गठित करणे :**

विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, प्रवेशांमध्ये आरक्षण धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालय/विभाग स्तरावर खालील प्रमाणे 'प्रवेश समिती' गठित करावी. प्रवेश समितीवर 'मागासवर्ग प्रतिनिधी'चे नाव विद्यापीठाद्वारे कळविण्यात येईल.

| अ.क्र. | समिती | संबंधीतांची नावे | पदनाम | सही व दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | | | |
| २. | सदस्य | | | |
| ३. | सदस्य | | | |
| ४. | सदस्य | | | |
| ५. | मागासवर्ग प्रतिनिधी | | | |

१/२...

ज्या अभ्यासक्रमासाठी केंद्रीयभूत प्रवेश संरचना आहे, त्या महाविद्यालयात/विभागात सदर समिती 'स्थानिक प्रवेश समिती' म्हणून कार्यरत असेल.

**(३) अभ्यासक्रम निहाय सामाईक यादी तयार करणे :**

शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये 'अभ्यासक्रम निहाय आरक्षण' धोरण लागू आहे. प्रवेश समितीने प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम अभ्यासक्रमनिहाय विभागणी करावी. तद्नंतर प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय पात्रताधारक (सर्व) विद्यार्थ्यांची (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसह) 'गुणवत्ता/गुणांकनिहाय सामाईक यादी' तयार करावी. (थोडक्यात, जेवढे अभ्यासक्रम शिकविले जातात, तेवढ्या स्वतंत्र याद्या तयार होतील.)

**(४) अभ्यासक्रम निहाय प्रवेश क्षमतेवर आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करणे :**

प्रत्येक शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रमनिहाय 'एकूण प्रवेश क्षमतेवर आरक्षण' धोरण लागू आहे. त्याप्रमाणे प्रत्येक अभ्यासक्रमाच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या ४० टक्के जागा खुल्या वर्गाला राहतील आणि ६० टक्के जागा मागास प्रवर्गासाठी खालील प्रमाणात (टक्केवारीप्रमाणे) राखीव असतील ;

| अ.क्र. | मागासप्रवर्ग | (Backward Class Category) | आरक्षणाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| ०१. | अनुसूचित जाती | (Scheduled Caste) | १३ % |
| ०२. | अनुसूचित जमाती | (Scheduled Tribe) | ०७ % |
| ०३. | विमुक्त जाती (अ) | (De-notified Tribes-A) | ०३ % |
| ०४. | भटक्या जमाती (ब) | (Nomadic Tribes-B) | २.५ % |
| ०५. | भटक्या जमाती (क) | (Nomadic Tribes-C) | ३.५ % |
| ०६. | भटक्या जमाती (ड) | (Nomadic Tribes-D) | ०२ % |
| ०७. | इतर मागासवर्ग | (Other Backward Class) | १९ % |
| ०८. | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | (Economically Weaker Section) | १० % |
| | एकुण | | ६० % |

उपरोक्तप्रमाणे खुला वर्ग व मागास प्रवर्गासाठी राखीव केलेल्या जागा भरण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करावी ;

(अ) खुल्या वर्गाच्या ४० टक्के जागा भरणे :

प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय एकूण प्रवेश क्षमतेच्या ४० टक्के विद्यार्थी संख्या ही खुल्या प्रवर्गातून प्रवेशासाठी पात्र ठरते. त्यासाठी उपरोक्त (३) प्रमाणे तयार केलेली 'गुणवत्ता/गुणांकनिहाय सामाईक यादी' मधील सुरुवातीच्या ४० टक्के विद्यार्थ्यांची खुल्या प्रवर्गासाठी निवड करावी. सदर यादीत निवड झालेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातूनच प्रवेश देण्यात यावा, त्यांचा समावेश मागासवर्गीय प्रवर्गासाठी तयार केलेल्या यादीत करू नये.

(ब) मागासवर्गीयांच्या ६० टक्के राखीव जागा भरण्याची कार्यपध्दती :

(i) उपरोक्त (अ) प्रमाणे खुल्या वर्गाच्या ४० टक्के जागांसाठी निवड झालेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्यानंतर खालोखाल गुणवत्ता/गुणांक प्राप्त केलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या 'मागासप्रवर्ग निहाय स्वतंत्र याद्या' तयार कराव्यात. (जसे की, अ.जाती, अ.जमाती, वि.जा.-अ, भ.ज.-ब, भ.ज.-क, भ.ज.-ड, इमाव व आ.दु.घटक याप्रमाणे...) सदर याद्या त्या-त्या मागासप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता/गुणांकानिहाय असतील. तद्नंतर, उपरोक्त (४) मध्ये विहित टक्केवारीप्रमाणे प्रत्येक मागासप्रवर्गाच्या वाट्याला आलेल्या जागांवर, सदर याद्यांमधील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

(ii) उपरोक्त (ब) (i) प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविल्यानंतर, जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्यास, अशा जागांपैकी एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त ०२ टक्केपर्यंत विशेष मागास प्रवर्गातील (SBC) विद्यार्थ्यांना गुणत्तेनुसार प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

(iii) उपरोक्त (ब) (ii) नुसार ०२ टक्केपर्यंत विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रवेश देवूनही जर मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर, अशा रिक्त जागा खालीलप्रमाणे मागासवर्गीय प्रवर्गांच्या गटांमधील अन्य प्रवर्गातून गुणवत्तेनुसार अदलाबदलीने (Inter-Changeability ने) भराव्यात ;

२/३..

| | | | |
|---|---|---|---|
| गट १ | अनुसूचित जाती<br>आणि<br>अनुसूचित जमाती | } | या दोन प्रवर्गात अदलाबदल करावी. |
| गट २ | विमुक्त जाती (अ)<br>आणि<br>भटक्या जमाती (ब) | } | या दोन प्रवर्गात अदलाबदल करावी. |
| गट ३ | भटक्या जमाती (क)<br>आणि<br>भटक्या जमाती (ड)<br>आणि<br>इतर मागासवर्ग | } | या तीन प्रवर्गात अदलाबदल करावी. |

(iv) उपरोक्त (ब) (iii) नुसार, संबंधीत गटांमध्ये अदलाबदल करून झाल्यानंतरही मागासवर्गीय प्रवर्गाच्या जागा रिक्त राहिल्या तर, त्या जागा अन्य सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करून भरण्यात याव्यात.

(v) उपरोक्त (ब) (iv) नुसार, कार्यवाही केल्यानंतरही मागासवर्गीय प्रवर्गाच्या जागा रिक्त राहील्यास, प्रवेश समितीने निर्णय घेऊन सदर जागा खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार भराव्यात व रिक्त ठेवू नयेत. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठाचे कुलसचिव व विशेष कक्षाला पाठविण्यात यावा.

**सर्वसाधारण सुचना :**

- नियमानुसार आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करणेकामी काही अडचणी असल्यास, विद्यापीठातील विशेष कक्षाला संपर्क करावा.
- विद्यापीठ अनुदान आयोग/राज्य शासन व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके / निर्णयांनुसार अपंग, सैन्य दलात सक्रिय सेवेत असलेले (अॅक्टीव्ह सर्व्हिसेस) / कर्मचारी तसेच माजी सैनिक यांची पाल्ये व खेळाडू हया वर्गवारीत विद्यार्थ्यांना त्यांच्या विहित टक्केवारीनुसार त्यांच्या संबंधीत खुल्या किंवा मागासवर्गीय प्रवर्गातील राखीव जागांमधून आडवे (Hotizontal) आरक्षण देण्यात यावे.
- खुल्या प्रवर्गातून निवड झालेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे देखील, शिष्यवृत्ती आणि फ्रि-शिपचे अर्ज न चुकता विहित मुदतीत भरून घ्यावेत आणि सदर अर्जाची विहित मुदतीत पडताळणीची कार्यवाही पुर्ण करावी.
- शासनाकडून प्रतिपुर्ती केली जाणारी कोणतीही फी (शुल्क) प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून वसूल करु नये.
- महाराष्ट्र राज्याबाहेरील अन्य राज्यातून स्थलांतरित होऊन आलेल्या, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी मागासवर्गीयांच्या राखीव जागेवर प्रवेश देण्यात येऊ नयेत. त्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावा.
- विद्यार्थ्यांना वसतीगृहाची सोय उपलब्ध असल्यास, वसतीगृहाची एकूण प्रवेश क्षमता विचारात घेऊन उपरोक्त क्र. ४ प्रमाणे आरक्षणाची अंमलबजावणी करावी.

(डॉ. विलास नांदवडेकर)
कुलसचिव

प्रती : मा. प्राचार्य/विभागप्रमुख/संचालक/प्रभारी,
विद्यापीठाचे सर्व पदव्युत्तर विभाग, संचलित व संलग्न महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

Shriram Mahila Vidynan Mahavidyalaya Paniv, Tal. Malshiras, Dist. Solapur



Principal
Shriram Mahila Vidynan Mahavidyalaya
Paniv, Tal. Malshiras, Dist. Solapur

**S.N.D.T women's University**
**1. Nathibai Thackersey Road**
**New Marine lines, Charchgate**
**MUMBAI-400020**
**Phone: +91 2222031879**
**+91 2222016226**

**Ref.No. Special cell/ A-04/2023-24/12** **Dt.16/05/2023**

## Circular

**Subject:** SOP regarding admission to students to various programs in PG Department in University, Conducted and Affiliated colleges.

Reference: 1) UGC Letters

- D.O.No.F.1-6/89(SCT), Dt.30/07/1989,
- D.O.No.F.1-4/89(SCT), Dt.18/06/1997,
- F.1-5/2006(SCT),Dt25/08/2006

2) Govt. of Maharashtra, Higher and Technology and Employment section, Ministry's

i. G.R. No. UGC/1493/(2428)/Vishi-4/,Dt.23/06/1994
ii. G.R. No. UGC/1494/16114/(2903)/Vishi-4,Dt.19/01/1995
iii. G.R.No.TEM3397/12926/(9086)/Tanshi-1,Dt.11/06/1997
iv. Letter No.BUC-2009/(23/9)Mashi-5,Dt.23/02/2009
v. Gov. Circular No. Sankirrn-2019/Pr.No.22/Vishi-3,Dt.08/03/2019

3) Maharashtra Act No. XXX of 2006, Dt.01/08/2006

4) Maharashtra Gov. General administration section, Ministry

- G.R. No. BCC-1094/cr-57/94/16-B Dt.05/12/1994

Madam/Sir,

As per guidelines issued from time to time by UGC, New Delhi and Govt. of Maharashtra, it has been instructed to implement the Reservation policy while admitting the

students to various programs in various PG Departments in University, Grantable and Non-grantable, conducted and affiliated colleges (UG, PG, M.Phil., Ph.D., etc....all) accordingly while admitting students to various programs, following SOP has been decided.

1. Advertisement of Program/Publicity

   Publish the advertisement of all the programs conducted in college/Departments with reservation in print and electronic Media.

2. Composition of Admission Committee

   Compose the Admission Committee as per UGC and State Govt. guidelines to monitor the implementation of reservation policy.

   Compose Admission Committee as given below

   (Name of the 'Backward Class Representative' will be informed by the University.

| Sr.No. | Committee | Name | Designation | Mobile No. and Signature |
|---|---|---|---|---|
| 1. | Chairman | | | |
| 2. | Member | | | |
| 3. | Member | | | |
| 4. | Member | | | |
| 5. | Backward class representative | | | |

This committee will work as 'Local Admission Committee' for programs for which Central Admission Process is followed.

3. Preparation of program wise common list

   There is program wise reservation policy in educational institute. Admission committee has to sort the students program wise. Then, prepare merit list of all eligible students for each program. (in short number of separate merit lists will be equal to number of programs conducted)

4. Implementation of reservation policy program wise on the basis of intake capacity.

Shriram Mahila Vidyan Mahavidyalaya Paniv Tal Malshiras Dist.Solapur

In each educational institute based on total intake capacity. Program wise reservation policy is applicable. Accordingly for each program 40 % seats of total intake capacity will be for open category and 60% seats will be reserved for backward class category in the proportion (%) given below.

| Sr. No. | Backward class category | Percentage of reservation |
|---|---|---|
| 1. | Scheduled caste | 13% |
| 2. | Scheduled Tribe | 7% |
| 3. | De-notified Tribes- A | 3% |
| 4. | Nomadic Tribes- B | 2.5% |
| 5. | Nomadic Tribes- C | 3.5% |
| 6. | Nomadic Tribes- D | 2% |
| 7. | Other backward classes | 19% |
| 8. | Economically weaker section | 10% |
| **Total** | | 60% |

For filling open category and backward class category seats as earmarked above follow the following process.

a. Filling of 40% open category seats

40% students from open category are eligible for program wise admissions. Select the first 40% students from the merit list prepared as in (3) above Backward class category students in the merit list must be admitted through open category only. They should not be included in the list prepared for backward class category.

b. Procedure for 60% seats from backward class category

i. Prepare 'backward class wise' separate merit list of backward class category students. Excluding the backward class students in the merit list of 40% open category students as in 'A' above (viz. SC, ST, D- NT- A, NT- B, NT- C, NT- D, OBC, EWS) this list will be as per merit list of concerned category. Then as per item number No. 4 give admission to students from concerned each category.

ii. After following the admission procedure as in (b) (1) if seats reserved for any category remain vacant, then maximum of 2% seats of total intake capacity may be preferentially filled from special backward class (SBC) on the basis of merit.

iii. As in (b) (2) if seats for backward class category students remain vacant, If even after admitting 2% students from special backward class then such vacant seats should be filled on merit list basis by inter-changeability among backward class category as described below.

| | | |
|---|---|---|
| **Group-I** | Scheduled castes and Scheduled Tribes | Interchange among these two categories |
| **Group-II** | D-Notified Tribes-A and Nomadic Tribes-B | Interchange among these two categories |
| **Group-III** | Nomadic Tribes-C and Nomadic Tribes-D and Other Backward class | Interchange among these three categories |

iv. As in (b) (iii), if seats of backward class remain vacant, even after interchanging in concerned groups, then such vacant seats should be filled from remaining all backward class students according to merit.

v. If seats of backward class remain vacant even after following the procedure as in (b) (iv), then admission committee will take decision to fill up vacant seats by admitting students from open category according to merit and seats should not be kept vacant.

Report of admissions to be sent to registrar of university and special cell.

General instructions

- Contact the Special Cell in the University, if there is any difficulty in implementation of reservation policy as per rules.
- As per circular/decision issued by UGC/State government and University from time to time, disabled, wards of defense service personal or Ex-servicemen and sport persons should be given horizontal reservation as per stipulated percentage in concerned open or backward class reservation.

Shriram Mahila Vidynan Mahavidyalaya Panlv ... Solapur

- Filing up and verification of scholarship forms of backward class students from open category must be completed within stipulated time limit.
- Any fee reimbursed by the government, should not be taken from students at the time of admission.
- Backward class students migrating from other states should not be admitted on reserved category seats. Admit them through open category.
- If facility of hostels is available, then considering the hostel capacity, implement reservation policy as per item 4 above.

(Dr.Vilas Nandwadekar )

Registrar

Copy to Hon. Principal/HOD. Director/ In charge

All PG Departments in a University

Conducted an affiliated colleges

Shriram Mahila Vidynan Mahavidyalaya Paniv, Tal.Malshiras,Dist.Solapur

Principal

Shriram Mahila Vidynan Mahavidyalya

Paniv, Tal. Malshiras.Dist.Solapur